**<u>ऑनलाईन परिशिष्ट-I (Schedule-I) आणि परिशिष्ट-X (Schedule-X) नोंदविण्याची कार्यप्रणाली.</u>**

१. परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-X बद्दलची माहिती ई-रेकॉर्ड करताना विश्वस्तांची मदत घेतल्यास ही माहिती भरणे सोपे जाईल आणि संगणकीकरणाचे काम त्वरित पुर्ण होऊ शकेल.

२. ज्या विश्वस्तांना त्यांच्या न्यासाची माहिती परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-X फॉर्ममध्ये ई-रेकॉर्ड त्वरित व्हावी असे वाटत असेल त्यांनी ती माहिती स्वत: संकेतस्थळावर भरावी.

३. ही माहिती विश्वस्तांनी कशी भरावी याबाबतची माहिती त्यांना संकेतस्थळावरुन प्राप्त होऊ शकेल.

४. विश्वस्तांनी सादर केलेली माहिती अधिक्षक मुळ दस्तऐवजांशी तुलना करुन तपासून घेईल आणि ती बरोबर असल्यास सहायक धर्मादाय आयुक्तांपुढे ठेवेल.

५. सहायक धर्मादाय आयुक्त आवश्यक ती चौकशी करुन नोंदणी संदर्भात पुढील आदेश करतील.

६. सहायक धर्मादाय आयुक्त ही माहिती स्वत: पुन्हा तपासुन बरोबर असल्याची खात्री करुन घेतल्यावर संकेतस्थळावर अपलोड करतील आणि अशी अपलोड झालेली माहिती हे त्या विश्वस्त संस्थेचे कायमस्वरुपी ई-रेकॉर्ड असेल.

७. संपुर्ण किंवा अंशत: माहिती चुकीची आहे असे नंतर निष्पन्न झाल्यास त्या विभागाचे धर्मादाय आयुक्त यांना अशी माहिती दुरुस्त करण्याचे अधिकार असतील. त्यासाठी त्यांनी करावयाच्या कारवाई बद्दलची माहिती संकेतस्थळावर दिली जाईल.

८. परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-X मधील माहिती ई-रेकॉर्डमध्ये रुपांतरित झाल्यानंतर पुढे त्यात जे जे बदल होत जातील ते त्यानुसार सहायक धर्मादाय आयुक्तांचे आदेश झाल्यावर आपोआप परिशिष्ट-I आणि परिशिष्ट-X मध्ये अंतर्भूत होईल.